


साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपश्यना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2567, पौष पौर्णिमा, 25 जानेवारी, 2024 वर्ष 7 अंक 11

वार्षिक शुल्क रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

## धम्मवाणी

**यथापि रुचिरं पुप्फं, वण्णवन्तं अगन्धकं।**
**एवं सुभासिता वाचा, अफला होति अकुब्बतो॥**
**यथापि रुचिरं पुप्फं, वण्णवन्तं सुगन्धकं।**
**एवं सुभासिता वाचा, सफला होति कुब्बतो॥**

*– धम्मपदपालि- 51-52, पुप्फवग्गो*

जसे एखादे पुष्प सुंदर आणि वर्णयुक्त असूनही गंधरहित असते, तसेच सुभाषित (बुद्ध) वाणी फलरहित होते जर कोणी त्यानुसार (आचरण) करीत नाही.

जर एखादे पुष्प सुंदर आणि वर्ण युक्त असून (सु)गंधित असते, तसेच सुभाषित (बुद्ध) वाणी फलरहित होते जर कोणी त्यानुसार (आचरण) करेल.

## जन्म शताब्दी विशेषांक

### कल्याणमित्र श्री सत्यनारायण गोयंकाजींचा जन्म शताब्दी समारोह दि. ४ फेब्रुवारी २०२४

प्रिय साधकांनो,

प्रधान विपश्यनाचार्य श्री सत्यनारायण गोयंकाजींच्या जन्म शताब्दीचा समारोह– 30 जानेवारी ऐवजी साधकांच्या सुविधेसाठी रविवार दि. ४ फेब्रुवारी २०२४ला 'विश्व विपश्यना पगोडा', गोराई, मुंबई व काही अन्य केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे.

त्यांनी शिकवलेल्या विपश्यनेच्या शुद्ध विधिच्या अभ्यासाने प्रत्येक साधकाला लाभ झाला आहे त्यामुळे हे स्वाभाविकच आहे की आपण सर्व त्यांच्याप्रति सदैवं कृतज्ञ आहोत. म्हणूनच त्यांची जन्म शताब्दी आपल्याकरीता एक विशेष प्रसंग बनला आहे की ज्यामुळे आपण त्यांच्या प्रेरणाजनक धार्मिक जीवनापासून स्वत:ला पुन्हा प्रेरित करु आणि आपली धर्म-चेतना, अभ्यास, आचरण तसेच धर्मसेवेला खूप बलवान बनवू. द्वितीय बुद्ध शासन तर पसरणारच आहे, आपणही आपल्या स्वत:ला त्या योग्य बनवून त्याचे अंग बनू आणि त्यापासून लाभ प्राप्त करु. चला तर मग, गोयंकाजींच्या जीवनावर एक नजर पुन्हा टाकूयात!

गोयंकाजींचा जन्म माघ शुक्ल द्वादशीला १९२४ मध्ये मांडले शहर, म्यंमा इथे झाला. त्यांना शिक्षणात खूप रुची होती पण व्यावसायिक जीवनात लवकरच पाऊल ठेवल्यामुळे ते शिक्षण पूर्ण करु शकले नाहीत परंतु तरीही त्यांनी शिकणे सोडले नाही. द्वितीय विश्व-युद्धाच्या दरम्यान ते भारतात आले आणि राजस्थानमध्ये आपल्या पूर्वजांच्या चूरू या गावात राहिले. तिथे हिंदी साहित्य संम्मेलन, प्रयागच्या माध्यमातून हिंदीचे शिक्षण चालू ठेवले. युद्धानंतर म्यंमाला परत गेले आणि व्यवसायात खूप प्रगती केली. अनेक सामाजिक जबाबदाऱ्याही आपल्या खांद्यावर घेतल्या. परिणामस्वरूपाने ताण वाढत गेला आणि लहानपणापासून असलेल्या मायग्रेनच्या रोगाचा जो त्रास त्यांना अधून मधून व्हायचा तो आता प्रत्येक आठ-पंधरा दिवसांनी होऊ लागला. रोगाच्या उपचारासाठी सर्व रस्ते बंद झाल्याने त्यांचे मित्र, म्यंमाचे तत्कालीन एटॉर्नी जनरल ऊ छान टुन यांनी त्यांना विपश्यना साधना आजमावून पहायला सांगितली आणि म्यंमाचे तत्कालीन अकाउंटेंट जनरल ऊ बा खिन यांच्याकडे पाठविले. त्या वेळी प्रथम बुद्ध शासनाचा अंत आणि द्वितीय बुद्ध शासनाचा आरंभ होणारच होता. म्यंमामध्ये सहावी संगिती चालू होती. तेव्हा मार्च १९५५ मध्ये गोयंकाजी पहिल्यांदा सयाजी ऊ बा खिन यांना भेटले. सयाजींनी विपश्यनेचा उपयोग केवळ मायग्रेनच्या निवारणासाठी न करता निर्वाण-प्राप्तीच्या लक्ष्यासाठी करण्याला प्रेरित केले.

परत आले तेव्हा काही वेळापर्यंत संकोच करीत राहिले आणि मग एक दिवस आश्रम पाहण्यासाठी म्हणून गेले तेव्हा तिथे त्यांची भेट सयाजींशी झाली. त्यांना म्हणाले की सयाजी आता मी शिबिरात आध्यात्मिक उन्नतीची विद्या शिकण्यासाठीच येईन. सयाजी म्हणाले की आत्ता पावसाळ्यात इथे शिबिर होत नाही, पुढचे शिबिर १ सप्टेंबरला सुरु होईल त्यात तुम्ही भाग घ्या. या माझ्यासोबत दुपारचे शाकाहारी जेवण पण करुन जा. मला विश्वास आहे की तुम्हाला चांगले वाटेल.

"मी सयाजींना नमस्कार करून त्यांचा निरोप घेतला आणि घरी परत आलो. शिबिर सुरु होण्यासाठी अजून अडीच-तीन महिने बाकी होते. मला हे पाहून आश्चर्य वाटले की इतक्या दिवसांमध्ये माझ्यावर मायग्रेनचा हल्ला झाला नाही. साधना न शिकताच वारंवार माझे मन आतल्या दिशेने एकाग्र होऊ लागले, खूप सुखद अनुभूती होती ती".

[मला जवळपास ३० वर्षांनी हे माहित झाले की त्यावेळी त्यांनी आपल्याजवळ बसलेल्या एका शिष्याला माझ्याविषयी असे म्हटले होते की हा एक प्रभूत पुण्यपारमीसंपन्न 'पोगो' (पुद्गल/ व्यक्ती) आहे, विपश्यना घेईल तर याचे जीवन बदलून जाईल.– स.ना.गो.]

अनेक जन्मांच्या पूर्वाभ्यासाने श्री गोयंकाजींची पारमी खूप पुष्ट होती, गुरुत्व एकदम स्वच्छ होते. आणि असे घडले देखील.

पहिल्याच शिबिरात खूप लक्षणीय प्रगती झाली आणि ते सयाजींसोबत पूर्णपणे जोडले गेले. म्यंमामध्ये लोकतंत्र समाप्तीबरोबरच जेव्हा सर्व व्यवसायांचे राष्ट्रीयकरण झाले तेव्हा गोयंकाजींची औद्योगिक संस्थाने हिरावल्यानंतरही त्यांच्या समतेमध्ये कोणती कमतरता आली नाही. एकच भाव जागला की आता धर्मासाठी पुरेसा वेळ मिळेल. सयाजींच्या चरणांशी बसून धर्माचा अभ्यास, सेवा आणि त्याचबरोबर परियत्तिचेही खूप अध्ययन आणि अभ्यास केला.

१९६९ मध्ये जेव्हा गुरुजी भारतात आले तेव्हा सयाजींनी आठवण करून दिली की भारतात तुम्ही नाही, धर्म जात आहे. वास्तविकपणे गोयंकाजी तर योग्य पात्र होतेच. धर्म भारतात आला. अशोककालीन तृतीय संगीतीवेळी जेव्हा धर्मदूत अनेक स्थानांवर पाठविले गेले तेव्हा कोणा संताने भविष्यवाणी केली होती की हे धर्म-रत्न सुवर्ण-भूमी (म्यंमा) मध्ये सुरक्षित राहील आणि भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणाच्या २५०० वर्षांनंतर पुन्हा भारत-भूमीत परतेल. ही गोष्ट मौखिक रूपाने पिढ्यानपिढ्या म्यंमा व इतर थेरवादी देशांमध्ये चालत राहिली.

गोयंकाजी जेव्हा भारतात आले आणि ज्या प्रकारे धर्माचा प्रकाश भारताबरोबर संपूर्ण विश्वात लाखो लोकांपर्यंत पसरू लागला तेव्हा सयाजींचे भाकित स्पष्ट झाले की खरोखर– "धर्म जात आहे".

सयाजींचे मार्गदर्शन १९७१ पर्यंत निरंतर मिळत राहिले परंतु त्यांच्या देहांतानंतर, आपल्या धर्म चेतनेला ज्या प्रकारे दृढ बनवून गोयंकाजींनी ४५ वर्षांपर्यंत धर्माला सर्वत्र पसरविले यातून त्यांच्या मनाची असाधारण निर्मळता, धर्मात असाधारण श्रद्धा, अहंभावाला मागे ठेवून द्वितीय बुद्ध शासनाप्रतिचे पूर्ण आत्म-समर्पण स्पष्टपणे दिसून येते.

पहिल्या शिबिरापासूनच अव्याहतपणे निःशुल्क शिबिरे चालवित राहिले. विपश्यनेने लाभान्वित झाल्यावर केवळ इतरांच्या कल्याणार्थ स्वेच्छेने दिलेल्या साधकांच्या दानातूनच शिबिरे घेतली जात आहेत. जेव्हा गोयंकाजींनी सप्टेंबर २०१३ मध्ये शरीर सोडले तेव्हा विश्वातील प्रत्येक महाद्वीपावर आणि प्रत्येक महत्वपूर्ण राष्ट्रांमध्ये विपश्यना केंद्र कार्यरत होती. त्यांच्या देहावसानापर्यंत जवळपास १८० केंद्रे तसेच १२०० हून अधिक सहायक आचार्य नियुक्त करण्यात आले होते. लाखोंच्या संख्येने गरीब, मध्यमवर्गीय आणि संपन्न परिवारातील लोक विपश्यनेने लाभान्वित झाले होते.

परियत्तिच्या क्षेत्रात देवनागरी लिपीमध्ये त्रिपिटकाला पुस्तकाच्या रूपात प्रकाशित करुन पालि पंडितांना तसेच सार्वजनिक वाचनालयांमध्ये वितरीत करण्यात आले. याच्या व्यतिरिक्त भारताच्या आणि विश्वाच्या अनेक लिपींमधून पालि त्रिपिटक इंटरनेटवर निःशुल्क उपलब्ध करवून दिले गेले. त्याचबरोबर, त्रिपिटकातून प्राप्त झालेल्या भगवानांच्या अनेक उपदेशांचा पालितून हिंदी, इंग्रजी तसेच इतर अनेक भाषांमध्ये केलेला अनुवादही प्रकाशित करण्यात आला.

अनेक पगोड्यांचे, स्तूपांचे निर्माणकार्य संपन्न झाले ज्यामध्ये मुख्य आहे, "विश्व विपश्यना पगोडा", जिथे भगवान बुद्धांचे शरीर-धातु प्रतिष्ठापित केले गेले आहेत ज्यांना सहस्राधिक वर्षांपर्यंत हा सुरक्षित ठेवेल, त्याचबरोबर सद्धर्माला इतक्या वर्षांपर्यंत सुरक्षित ठेवणाऱ्या आणि भावी पिढीला उपलब्ध करून देणाऱ्या म्यंमाच्या गुरु-शिष्य परंपरेच्या प्रति कृतज्ञताही व्यक्त करीत राहिल.

एकाच जीवनात, एकटे आलेले गोयंकाजी, इतके मोठे काम करून गेले आणि इतक्या साधकांना एकत्र जोडून अत्यंत विशाल संस्थानांचा समूह साधकांवर सोपवून गेले. ते म्हणतही असत– "माझे तर दोनच हात, हजारो हात धर्माचे." आपल्यालाही पुण्य अर्जित करण्यासाठी खूप मोठा आधार आहे हे– धर्मकार्य.

साधक तर आदराने आणि कृतज्ञतेने भाव-विभोर होऊन त्यांना गुरुजीच म्हणतात परंतु ते स्वतःला कल्याणमित्रच मानत होते.

हा कोणता मनोरचित शब्द नाही, भगवानांचा वाणीतून घेतला गेलेला खूप महत्वपूर्ण शब्द आहे. कल्याणमित्रतेच्या विषयात भगवान बुद्धांनी अनेक उपदेश दिले. अङ्गुत्तरनिकायमध्ये एककनिपातच्या कल्याणमित्तादिवर्गामध्ये भगवान म्हणतात– *'नाहं, भिक्खवे, अञ्ञं एकधम्मम्पि समनुपस्सामि येन अनुप्पन्ना वा कुसला धम्मा उप्पज्जन्ति उप्पन्ना वा अकुसला धम्मा परिहायन्ति यथयिदं, भिक्खवे, कल्याणमित्तता। कल्याणमित्तस्स, भिक्खवे, अनुप्पन्ना चेव कुसला धम्मा उप्पज्जन्ति उप्पन्ना च अकुसला धम्मा परिहायन्ती''ति।*

मी असा एकही धर्म पाहत नाही जो अनुत्पन्न कुशल धर्माचा उत्पाद करेल, उत्पन्न अकुशल धर्मांचा प्रहाण करेल जसे की भिक्षूंनो– कल्याणमित्रता. कल्याणमित्रच अनुत्पन्न कुशल धर्माला उत्पन्न करतात आणि उत्पन्न अकुशल धर्माचे प्रहाण.

अङ्गुत्तरनिकायच्या सत्तकनिपातमधील दुतियमित्तसुत्तात भगवान कल्याणमित्राच्या सात धर्मांमधील दक्षतेचा परिचय करवून देतात– *"सत्तहि, भिक्खवे, धम्मेहि समन्नागतो भिक्खु मित्तो सेवितब्बो भजितब्बो पयिरुपासितब्बो अपि पनुज्जमानेनपि। कतमेहि सत्तहि? पियो च होति मनापो च गरु च भावनीयो च वत्ता च वचनक्खमो च गम्भीरञ्च कथं कत्ता होति, नो च अट्ठाने नियोजेति । इमेहि खो, भिक्खवे, सत्तहि धम्मेहि समन्नागतो भिक्खु मित्तो सेवितब्बो भजितब्बो पयिरुपासितब्बो अपि पनुज्जमानेनपी''ति।*

सात धर्मांना प्राप्त असलेला भिक्षू (कल्याण) मित्र आहे, सेवेच्या योग्य आहे, पूजनाच्या योग्य आहे, त्याने आपल्याजवळ बोलावले नाही तरी त्याच्याजवळ राहण्यायोग्य आहे. कोणते सात धर्म? (लोक) प्रिय असतो (पियो), सुखद असतो (मनापो), गुरु असतो (गरु), आचरणाने युक्त असतो (भावनीयो), वक्ता असतो (वत्ता), मधुर वाणी बोलणारा असतो (वचनक्खमो), गंभीर विषयांवर संभाषण करणारा असतो (गंभीरञ्च कथं कत्ता), जो कुशलतेकडे जाण्यासाठी प्रेरित करणारा असतो (नो च अट्ठाने नियोजेति). असा सात धर्मांना प्राप्त असणारा भिक्षू कल्याणमित्र आहे, सेवेच्या योग्य आहे, पूजनाच्या योग्य आहे, त्याने आपल्याजवळ बोलावले नाही तरी त्याच्याजवळ राहण्यायोग्य आहे.

असे जाणल्यानंतर लक्षात येते की किती भाग्यशाली आहोत आपण जे आपल्याला गोयंकाजींसारख्या कल्याणमित्राचे सान्निध्य आणि मार्गदर्शन प्राप्त झाले, शुद्ध विपश्यना विधि शिकण्याची संधी मिळाली आणि आजदेखील त्यांच्याच निर्देशानुसार विपश्यना करीत आहोत.

अशा कल्याणमित्राच्या जन्म शताब्दीला त्यांनी दिलेल्या शिकवणीच्या प्रत्येक महत्वपूर्ण उपदेशाचे स्मरण करणे, त्याचा अभ्यास करणे आणि त्या महत्वाच्या दिवशी तर सर्व साधकांसोबत एकत्र मिळून सामूहिक साधना करणे अत्यंत लाभकारी आहे.

याकरीता दि.४ फेब्रुवारी २०२४ ला मुंबई स्थित विश्व विपश्यना पगोडामध्ये सामूहिक साधना तसेच काही अन्य विशेष कार्यक्रम आयोजित

करण्यात आले आहेत. आपणा सर्वांना निवेदन आहे की आपण या संधीचा अवश्य लाभ घ्यावा. जर काही कारणांमुळे आपण येऊ शकला नाहीत तर कमीत कमी आपल्या निवासस्थानी किंवा जवळच्या केंद्रावर जाऊन अवश्य साधना करावी. त्या दिवशीच्या कार्यक्रमाचे इंटरनेटवर प्रसारणही केले जाईल. विश्वातील सर्व लोक मग ते कुठेही असोत, जर एकत्र ध्यान करण्यासाठी तत्पर असतील तर निश्चित रूपाने सर्व लोकांना एकमेकांकडून बळ मिळेल आणि सर्वांची साधना पुष्टतर होईल यात काही शंका नाही, म्हणूनच भगवानांनी म्हटले आहे– “समग्गानं तपो सुखो”।

गुरुजींची जन्म शताब्दी आपल्या धर्माच्या अभ्यासाला नव्या ऊर्जेने भरू दे, तर मग या ! पुन्हा सुरु करूया !

सादर प्रणाम !

## रविवार दि. ४ फेब्रुवारी, २०२४ चे कार्यक्रम

### (हे फक्त साधकांसाठी)




येथे स्कॅन करुन आपले नाव रजिस्टर करू शकता. (बुकिंग अनिवार्य आहे)

प्रिय धर्मबंधू आणि भगिनींनो,

पूज्य गुरुजी श्री सत्यनारायण गोयंकाजीं (१९२४-२०२४) च्या जन्म-शताब्दी निमित्त आपणा सर्वांना मंगल मैत्री.

गुरुजींनी खूप करुणा आणि मैत्रीपूर्वक आपणा सर्वांना विपश्यनेच्या शुद्ध विधीचे धर्मदान दिले. आपल्याला आपल्या दु:खातून मुक्त होण्याचा मार्ग दाखविला आणि या कार्यात आत्मनिर्भर बनवले. त्यांनी आपल्या जीवनाची ५८ वर्षे आपल्या स्वत:ला धर्मात पुष्ट करण्यात आणि धर्माला प्रसारित करण्यात व्यतीत केली. १९६९ मध्ये भारतात आल्यानंतर त्यांनी विपश्यनेला विश्वभरात अनेक साधकांपर्यंत पोहोचविले. विपश्यनेने आपल्याला स्वत:च्या मनाला निर्मळ बनविण्याची आणि अनेक धर्म-पिपासूंची सेवा करण्याची संधी प्राप्त करून दिली ज्यामुळे आपल्याला द्वितीय बुद्ध-शासनात आपले योगदान देऊन पारमी अर्जित करण्याची संधी मिळाली.

आता पूज्य गुरुजींची जन्म शताब्दी हा एक असा प्रसंग आहे ज्या निमित्ताने आपण गुरुजींच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच आपल्या साधनेला आणि सेवेला नव्या उर्जेने भरू शकतो. त्याकरीता मुंबई-स्थित “विश्व विपश्यना पगोडा” येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे, ज्याचे थेट प्रक्षेपण यूट्यूबवर देखील करण्यात येईल.

हा कार्यक्रम रविवार दि.४ फेब्रुवारी २०२४ ला विश्व विपश्यना पगोडा येथे सकाळी १० पासून संध्याकाळी ४ वाजेपर्यंत संपन्न होईल. आम्ही आशा करतो की “विश्व विपश्यना पगोडा” मध्ये प्रतिष्ठापित भगवान बुद्धांच्या शरीर-धातुंच्या सानिध्यात जास्तीत जास्त संख्येने आपण सर्वजण एकत्र बसून तपण्याच्या या अनमोल सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्याल.

गुरुजी अनेक वेळा भगवानांच्या या वाणीचे महत्व समजावित असत– ***“समग्गानं तपो सुखो”***– एकत्र बसून तप करणे खूप सुखदायक आहे.

तर मग या! ४ फेब्रुवारी २०२४ला आपण विश्वात जिथे कुठे असू, आपल्या तसेच अनेकांच्या हित-सुखासाठी एकत्र मिळून विपश्यना साधना करू अर्थात आपण सारे विश्वातील लोक मिळून समग्गानं चा लाभ घेवू. सर्वांच्या एकत्रित ऊर्जेच्या बळावर साऱ्या विश्वाचे कल्याण होवो. पूज्य गुरुजींच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा खूप मोठा आणि योग्य सुअवसर आहे.

आम्ही आपले आपल्या सोयीनुसार कोणत्याही वेळी भाग घेण्याचे स्वागत करतो. आपण या कार्यक्रमात अनेक प्रकारांनी भाग घेऊ शकता, जसे:

१. विश्व विपश्यना पगोडामध्ये साधना करु शकता (नोंदणीसाठी लिंक: https://centenary.globalpagoda.org )

२. जवळच्या विपश्यना केंद्रावर साधना करू शकता, (केंद्रावर सुविधा असेल तर) (सर्वत्र थेट प्रक्षेपण होइल.)

३. सामूहिक साधनेकरीता नेहमी ज्या ठिकाणी जात असता तिथेच व्यवस्था करून साधना करू शकता.

४. स्थानिक धर्म-बंधू-भगिनींसमवेत सामूहिक साधनेचे आयोजन करूनही आपण भाग घेऊ शकता.

५. घरी किंवा कार्यालयातही व्यवस्था करुन साधना करु शकता.

कार्यक्रमाचे थेट-प्रक्षेपण Vipassana Meditation ‘यूट्यूब’ चॅनेलवर केले जाईल.

*Link:https://youtube.com/live KSKfzUOvWjQ?feature=share*

### विश्व विपश्यना पगोडामधील कार्यक्रमांची रूपरेषा खालीलप्रमाणे आहे:—

| वेळ | कार्यक्रम |
|---|---|
| सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत | सामूहिक साधना |
| दुपारी १२ ते १२.३० वाजेपर्यंत | भगवान बुद्धांपासून ते कल्याणमित्र सत्यनारायण गोयंकाजींपर्यंत गुरु-शिष्य परंपरेद्वारे धर्म-यात्रेची मनमोहक प्रदर्शनी |
| दुपारी १२.३० ते १.४५ वाजेपर्यंत | भोजनावकाश |
| दुपारी १.४५ ते २.०० वाजेपर्यंत | जन्म-शताब्दीचे महत्व |
| दुपारी २.०० ते २.१५ वाजेपर्यंत | पूज्य गुरुजी श्री सत्यनारायण गोयंका यांच्या १९५५ पर्यंतच्या जीवनावर एक फिल्म |
| दुपारी २.१५ ते २.३० वाजेपर्यंत | १.पूज्य गुरुजी श्री सत्यनारायणजींचे आत्मकथन- ‘Let Us Walk the Path of Dhamma’ तसेच ‘चलें धर्म के पंथ’ या पुस्तकांचे अनावरण<br>२. ‘विपश्यना: विश्व शांतिसाठी आंतरिक शांति’ नावाच्या कॉफी टेबल पुस्तकाचे अनावरण<br>३. ‘स्मारिका दैनंदिनी- धर्म का जीवन’ चे अनावरण |
| दुपारी २.३० ते ३.०० वाजेपर्यंत | पूज्य गुरुजी श्री सत्यनारायण गोयंकाजींची स्वप्ने आणि आपले कर्तव्य |
| दुपारी ३.०० ते ३.३० वाजेपर्यंत | पूज्य गुरुजी श्री सत्यनारायण गोयंकाजींच्या जन्म-शताब्दीच्या पावन प्रसंगी सम्मा संकप्पो (सम्यक संकल्प) |
| दुपारी ३.३० ते संध्या. ४.०० | मंगल मैत्री |

ही अनेक साधकांसाठी एकत्र जमून साधना करण्याची तसेच पूज्य गुरूजींच्या प्रति आपली कृतज्ञता व्यक्त करण्याची सुवर्ण-संधी आहे.

*सादर प्रणाम व मंगल मैत्री,*

***ट्रस्टीगण, विश्व विपश्यना प्रतिष्ठान व विपश्यना विशोधन विन्यास, मुंबई***

## जन्म शताब्दी कार्यक्रमासाठी विशेष बसेसची व्यवस्था

**नाशिक, पुणे तसेच मुंबईच्या विभिन्न ठिकाणांहून 4 फेब्रुवारीला पगोडा यथे जाण्या-येण्यासाठी साधकांतर्फे काही बसेसची व्यवस्था केली गेली आहे. या संबंधी अधिक माहितीसाठी व बुकिंगसाठी खालील लिंकवर क्लिक करा.**

***http://busseva.tejash.me***

### नये उत्तरदायित्त्व

**वरिष्ठ सहायक आचार्य**

1. कु. शीला सोनटक्के, नागपूर
2. श्री धनराज रामटेके, नागपूर
3. श्री नामदेव भोयर, अकोला
4. श्री जयंत मानकर, घाटनजी, यवतमाळ
5. श्री भगवान सरदार, घाटनजी, यवतमाळ

**नव नियुक्त सहायक आचार्य**

1. श्री राम सेवक मौर्य, वाराणसी, उत्तर प्रदेश
2. श्री रमेश चन्द गौतम, नोएडा, उत्तर प्रदेश
3. सुश्री किरन आर्या, जिल्हा बस्ती, उत्तर प्र.
4. श्रीमती विमलताई परदेशी, जळगांव
5. श्री नवनीत कोचे, नागपूर

**बालशिविर शिक्षक**

1. श्री मयिल मुरुगन, सिरकाली (तमिलनाडु)
2. कु. मीरा मोहन, चेन्नई
3. श्री सरवनन एस, चेन्नई
4. कु. सथियावानी मुरुर्गन, थेनी (तमिलनाडु)
5. श्रीमती मंजू गुप्ता, अलवर
6. श्री रशाद हुसैन, गुवाहाटी
7. श्री दिगंता काकती, गुवाहाटी
8. Mrs Romanea Chem, Cambodia

## मुंबई महानगर क्षेत्रातील विपश्यनेसंबंधी कार्यक्रम

मुंबई महानगर तसेच आसपासच्या क्षेत्रांमध्ये कित्येक विपश्यना केंद्र आणि ध्यानाच्या सुविधा उपलब्ध आहेत. याविषयीच्या साविस्तर माहितीसाठी कृपया खालील लिंक वर पहावे- https://mumbai.vridhamma.org

अशा प्रकारे **संपूर्ण भारतात 1-दिवसीय शिबिरे आणि सामूहिक साधनासंबंधी** कृपया या लिंकवर क्लिक करून पहावे- https://www.vridhamma.org/1-day-Courses-Information-in-India

°°°°°°°°°°°°°°°°°°°°°°

### ऑनलाइन भावी शिबिर कार्यक्रम व आवेदन

सर्व भावी शिबिरांची माहिती नेटवर खालील लिंक्स वर उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे बुकिंग केवळ ऑनलाईन होत आहे. म्हणून आपल्याला निवेदन आहे की खालील लिंक वर चेक करा आणि आपल्याला उपयुक्त शिबिरासाठी अथवा सेवेसाठी सरळ ऑनलाईनच आवेदन करावे.

***https://www.dhamma.org/en/schedules/schgiri***

°°°°°°°°°°°°°°°°°°°°°°

विश्वभरातील सर्व भावी शिबिरांची माहिती व आवेदनासाठी:
*https://schedule.vridhamma.org व www.dhamma.org*
व खालील लिंक पहावी
***https://www.dhamma.org/en-US/locations/directory#IN***

***हिंदी वेबसाइटसाठीः www.hindi.dhamma.org***

°°°°°°°°°°°°°°°°°°°°°°

## दोहे धर्माचे

गुरुवर तुमच्या चरणांची, धुळ लागे मम शीश।
सदा धर्मात रत राहू, मिळे रे हा आशिष॥
आज नमनाचा दिन रे, अंतरी भरे उमंग।
श्रद्धा आणि कृतज्ञता, विमल भक्तीचा रंग॥
ग्रहण करू गुरुदेवजी, असा रे शुभ आशिष।
धर्मबोधी हृदयी धरू, चरणी टेकू शीश॥
गुरुवर तुम्ही न भेटता, धर्म गंगा तीरावर।
तर गंगा पूजित बसे, कधी ना पितो नीर॥

## दोहे धर्माचे

सद्गुरु ने कृपा केली, दिले धर्माचे नीर।
आता धुवावे आपण, आपले मलीन चीर॥
सद्गुरु ने दिली साधना, धुण्यास चित्त विकार।
धुता धुता आपोआप, उघडे मुक्तीच द्वार॥
धन्य भाग्य! साबण मिळे, मिळे च निर्मल नीर।
सद्गुरु ची होय कृपा, धुतले मलीन चीर॥
गुरु तर पथ च दाखवितो, पथ दिला दाखवून ।
तर पोहोचू लक्ष्यावर, स्वतः रे धावून॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2567, पौष पौर्णिमा, 25 जनवरी, 2024 वर्ष 7 अंक 11

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK/RNP 286/2024-2026

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) (किरकोळ विक्री होत नाही)
**DATE OF PRINTING: 16 JANUARY, 2024, DATE OF PUBLICATION: 25 JANUARY, 2024**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244998, 243553, 244076, 244086, 244144, 244440
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org